IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
IJARSCT
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 3, January 2023

# उद्योजकता : बेरोजगारी दूर करण्यासाठी काळाची गरज

**प्रा. उदय खंडू टेके and डॉ. सोमनाथ भागा सानप**
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग, एम. एस. जी. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प

वर्ष २०२४ पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर्सची करण्याचे उद्दिष्ट भारताचेपंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठेवले आहे ते उद्दिष्ट गाठणे सध्याच्या आर्थिक वाढीचा दर पाहता अवघड दिसत आहे. भारतीय आर्थिक वाढीच्या दराची समस्या ही आहे की या आर्थिक वाढीसोबत नोकऱ्यांमध्ये वाढ होताना दिसत नाही.यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीला ***'जॉबलेस ग्रोथ'***अर्थात रोजगारविरहीत वाढ म्हटले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे एक स्वप्न आहे की भारत जागतिक स्तरावरील विकसित अर्थव्यवस्थाम्हणून पुढे यावा. परंतु यासाठी केवळ आर्थिक वाढीचा दर पुरेसा नाही. तर त्यासाठी गरिबी कमी करून रोजगाराच्या संधी वाढवाव्या लागतील.

कोरोना महामारीचा परिणाम म्हणून भारतातील बेरोजगारीचा वेग वाढत आहे भारतामध्ये बेरोजगारीची आकडेवारी अधिकृतरीत्या जाहीर केली जात नाही. परंतु सेंटर फॉर मॉनिटरिंग द इंडियन इकॉनॉमी (CMIE)ची याविषयीची आकडेवारी आधारभूत धरली जाते.सेंटर फॉर मॉनिटरिंग द इंडियन इकॉनॉमी (CMIE)च्या आकडेवारीनुसारलॉकडाऊनमुळे एप्रिल २०२०मध्ये देशभरात १२कोटींपेक्षा जास्त लोक बेरोजगार झाल्याचं आढळून आले आहे.[1]या संस्थेने सादर केलेल्या आकडेवारीनुसार देशातील बेरोजगारीचा दर एप्रिल २०२०मध्ये २३.५ टक्के,मे २०२० मध्ये २७.१० टक्के[2]इतका होता तर अर्थव्यवस्था पूर्वपदावर येत असताना हा दर ऑक्टोबर २०२०मध्ये ७टक्के, नोव्हेंबरमध्ये ७.७५टक्केआणि डिसेंबरमध्ये ७.९१टक्केइतकाउच्चांकी वर पोहोचला आहे.[3]

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ९० टक्केजनता असंघटित क्षेत्रामध्ये काम करते. लॉकडाऊनचा पहिला फटका याच असंघटित क्षेत्राला बसला. सतत लावण्यात आलेला कर्फ्यू, उद्योगांचं अनेक दिवस बंद राहणे आणि लॉकडाऊन नेमका कधी संपेल याविषयीची अनिश्चितता यासगळ्याचा परिणाम हा संघटित क्षेत्र आणि त्यामधल्या कायमस्वरूपी नोकऱ्यांवरही झालेला आहे. लॉकडाऊनचा भारतीय अर्थव्यवस्थेतील संघटित क्षेत्रावर किती मोठा परिणाम झालाय, हे CMIEच्या आकडेवारीवरून दिसून येतं.
संघटित क्षेत्रात एकूण १२.२०कोटी लोक बेकार झाले. यापैकी ०९.१३कोटी हे लहान व्यापारी आणि मजूर होते. तर ०१.७८कोटी पगारदार कर्मचाऱ्यांच्याही नोकऱ्या या काळात गेल्या आहेत. स्वतःचा उद्योग असणारे ०१.८२कोटी लोकही या काळात बेरोजगार झाले.[4]लॉकडाऊनच्या पूर्वीही भारतातला बेरोजगारीचा दर वाढतच होता. CMIEच्या आकडेवारीनुसार जून २०१७मध्ये बेरोजगारीचा दर ३.४ टक्केहोता. लॉकडाऊन सुरू होण्यापूर्वीच्या महिन्यातील म्हणजेच फेब्रु.२०२० मध्ये भारतातला बेरोजगारीचा दर ८.७टक्के%होता. हा दर तेव्हाच्या ४३महिन्यांतील सर्वोच्च होता.

अझिम प्रेमजी विद्यापीठानं केलेल्या अभ्यासातून समोर आलेल्या तथ्यांनुसार २०२०च्या लॉकडाऊनमध्ये १५ते २३वयोगटातील तरुण कामगारांना सर्वाधिक फटका बसला.लॉकडाऊनच्या पूर्वी जे पगारी काम करत होते, त्यांना लॉकडाऊननंतर पुन्ही ती कामं परत मिळाली नाहीत.[5]

वरील आकडेवारीतून भारतातील भारतातील बेकारीची दाहकता दिसून येते.१३८ कोटीपेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या भारतात तरुणांची संख्या ५० टक्क्यापेक्षा जास्त आहे,या सर्वांना सरकारी अथवा खाजगी नोकरी मिळणे केवळ अशक्य आहे.सरकार स्वतःयांना

---

[1]कोरोना लॉकडाऊन : भारतातल्या बेरोजगारांची संख्या १२कोटींवर पोहोचली-निखिल इनामदारबीबीसी ०९/०५/२०२०
[2]कोरोना लॉकडाऊन : भारतातल्या बेरोजगारांची संख्या १२कोटींवर पोहोचली-निखिल इनामदारबीबीसी ०९/०५/२०२०
[3]तरुणांमध्ये बेरोजगारी का वाढतेय? ऋजुता लुकतुके- बीबीसी मराठी दि.०१/०२/२०२२
[4]कोरोना लॉकडाऊन : भारतातल्या बेरोजगारांची संख्या १२कोटींवर पोहोचली-निखिल इनामदारबीबीसी ०९/०५/२०२०
[5]बेरोजगारी: भारतातील नोकऱ्यांचं संकट दिसतं त्यापेक्षाही खूप गंभीरसौतिक बिस्वास,बीबीसीमराठी दि.०९/०१/२०२२

नोकरी देऊ शकत नाही अथवा रोजगार निर्मिती करण्यासाठीचे सरकारचे प्रयत्न अपुरे पडत आहे.भारत सरकारचा २०२२-२३ चा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सितारामण जे ९० मिनिटांचे भाषण केले त्यामध्ये रोजगार हा शब्द फक्त ०३ ठिकाणी आला आहे.[6] यावरून सरकार बेरोजगारीवर किती गंभीर आहे हे कळते.यावर एक उपाय म्हणजे उद्योजकता होय.जगातील जे देश विकसित म्हणून ओळखले जातात त्या देशाच्या विकासामध्ये उद्योजकतेचे मोठे योगदान दिसून येते.म्हणून भारतातील युवकामध्ये उद्योजकतेविषयी जागरूकता निर्माण केली पाहिजे.

भारत हा युवकांचा देश आहे.युवाशक्ती हीच देशाची खरीसंपत्ती असेल तरतिने उद्योग उभा करून संपत्ती मिळवावी, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेतेव्हाच 'युवा उदयोजकांचा देश' म्हणून भारताची नवी ओळख निर्माण होईल. परंतुत्यासाठी गरज आहे नोकरीची मानसिकता बदलण्याची.बेरोजगारी हि समस्यायुवकांना खूप मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. परंतु त्याचवेळेला उदयोगाची अनेक दालनेखुली होत आहेत.तेव्हा प्रत्येक युवकाने एखादा तरी उद्योग सुरु करून उद्योगसंस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे.एकविसावं शतकं हे माहिती-तंत्रज्ञानाचं शतकं आहे. या शतकात कमीत कमी भांडवलात किंवा शून्य भांडवलातसुद्धा अनेक व्यवसायांची सुरुवात करता येऊ शकते आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तो व्यवसाय मोठाही करता येऊ शकतो. परंतु अनेकांना अशा अनेक उद्योग-व्यवसायांची माहितीच नसते. त्यासाठी यशस्वी नवउद्योजकांचा अभ्यास केला पाहिजे.या नवउद्योजकांमध्ये अलीबाबाचे संस्थापक जॅक मा,फ्लीपकार्टचे संस्थापक सचिन व बिन्नी बन्सल,पतंजलीचे संस्थापक बाबा रामदेव,बी.व्ही.जी.ग्रुपचे संस्थापक हणमंतराव गायकवाड,पेटीएमचे संस्थापक विजय शेखर शर्मा अशी अनेक नावे सांगता येतील.

आजचे युग हे बदलांचे, नवनव्या शोधांचे युग आहे. आर्थिक उदारीकरण, जागतिकीकरण आणि माहितीतंत्रज्ञान यामुळे उद्योग-व्यवसाय करण्याच्या पद्धतीत जगभरात कमालीचे बदलझालेले दिसतात. Today Idea is capital!(वर्तमान काळात नाविन्यपूर्ण कल्पना हेच भांडवल याला मान्यता मिळाली आहे.)याच्या जोरावर मायक्रोसॉफ्टचे बिल गेट्स, ॲपलचेस्टीव्ह जॉब्स आणि फेसबुकचे झुकेरबर्ग यांनी उद्योजकता ही मोजक्या लोकांचीमक्तेदारी नाही हे आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. यांची मागील पीढी उद्योजक नव्हती त्यांनी उद्योजकतेची परिभाषाचपूर्णतः बदलून टाकली आहे. उद्योजक बनण्यासाठी कुठल्याही विशिष्टधर्माचे वा विशिष्ट प्रदेशातील असण्याचीही गरज नाही. त्यासाठी काही गुणांची ,कौशल्याची आवश्यकता असते.आजच्या काळातउपयुक्त पडेल असे ज्ञान कल्पकतेने कृतीत आणू शकलात तर कुणीही एक यशस्वीउद्योजक होऊ शकतो.आजच्या तरुणांना इंटरनेटमुळे प्रत्येक क्षेत्राची जगभरातील माहिती उपलब्धआहे. आज माहितीचा महापूरच आला आहे असे म्हणणे योग्य ठरेल.आजच्या तरुणात स्वतः काही तरी करण्याची मनीषा दिसते. उत्पादन व सेवाक्षेत्रात स्वयंरोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध झाल्या आहेत. म्हणूनचआजच्या तरुणांनी नोकरी करण्यापेक्षा काही तरी स्वतः निर्माण करण्याकडे प्रवृत्त झाले पाहिजे.

जोसेफ शुम्पिटर यांच्या मते उद्योजक हा आर्थिक विकासाच्या केंद्रस्थानी असतो व तो आर्थिक विकासातील महत्वाचा मध्यस्थ असतो. आर्थिक विकासाला उद्योजकतेमुळे गती मिळते.आर्थिक विकासाच्या अनेक निदर्शकापैकी प्रमुख निदर्शक म्हणून औद्योगिक विकासाचा उल्लेख केला जातो.औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणारे सर्व घटक अनुकूल असतील,परंतु जर उद्योजकतेचा अभाव असेल तर त्या देशाचा औद्योगिक विकास होणे अशक्य असते.भारतीय अर्थव्यवस्था जगातील महत्वाची अर्थव्यवस्था ठरायची असेल तर नवनिर्मितीची आस असणारे उत्साही,धाडशी उद्योजकांची नितांत गरज आहे.भारत हा युवकांचा देश आहे असे म्हटले जाते कारण भारतातील एकूण लोकसंख्येपैकी ६३ टक्के लोकसंख्या १५ ते ५९ या वयोगटातील आहे.अभ्यासकांनी असे निदर्शनास आणून दिले आहे कि २५ ते ३४ या वयोगटातील व्यक्ती योग्य वातावरण मिळाले, काही उद्योजकीय गुण असतील तर उद्योजक म्हणून यशस्वी होऊ शकते.

**जागतिक बँकेने** *(World Bank)* व्यवसाय सुलभता अहवाल-२०१९ *(Ease of Doing business Report)* प्रसिद्ध केला.या अहवालानुसारव्यवसाय सुलभता निर्देशांकात भारताने १९०देशांच्या यादीत **७७वे** स्थान मिळवले आहे. या यादीत २०१४ पासून सलग भारताचे स्थान वाढत आहे. २०१४ मध्ये या अहवालात भारताचे स्थान १४२ वे होते. ते वाढत जाऊन या वर्षीच्या अहवालानुसार

[6]संधी आपलेही दार ठोठावते आहे....पी.चिदम्बरम लोकसत्ता दि.२०/०२/२०२२


DOI: 10.48175/IJARSCT-8150

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Volume 3, Issue 3, January 2023

Impact Factor: 7.301

७७ वर आले आहे. सलग दोन वर्षांत सर्वोत्कृष्ट सुधारणा करणाऱ्या पहिल्या दहा देशांत भारत राहिला आहे[7]. या अहवालानुसार भारतात नवीन व्यवसाय,उत्पादन सुरु करणे सोपे झाल्याने बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात व्यवसाय करण्यास इच्छुक आहेत.तसेच भारतातील 'भारतात बनवा' (Make in India),कौशल्य भारत (Skill India),मुद्रा योजना, स्टार्टअप(उद्यमारंभ)इंडिया,डिजिटल इंडियायांसारख्या महत्वाकांक्षी उपक्रमांमुळे आज तरुणांसमोर प्रगतीच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आजच्या तरुणाला जगाशी 'कनेक्ट' करायचे असेल, महत्वाचं म्हणजे 'कल्पनाशक्तीच्या जोरावर मी काहीतरी निर्माण करू शकतो' अशी मानसिकता त्याच्यात निर्माण करावीलागेल.

भारतातील प्रस्थापित उद्योजकांबरोबरच नव्याने उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या उद्योजकांना औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करण्याची हीच योग्य वेळ आहे.त्यासाठी उद्योजकता म्हणजे नेमके काय हे समजून घेणे गरजेचे आहे. 'उद्योजकता म्हणजे उद्योग करण्याची तीव्र इच्छा असणे व वैयक्तिक विकासाबरोबरच सामाजिक विकास कसा होईल याचा सतत प्रयत्न करणे होय.' महाराष्ट्रातील **'मॅक्सप्लोर' या संस्थेचे संस्थापक श्री. अजिंक्य पोतदार यांनी** 'कलर्ड ग्लासेसथेअरी'[8]मांडली आहे.या सिद्धांतानुसार 'उद्योजकता म्हणजे समोर असलेल्या प्रश्नांची उकल करून उपाय शोधणे होय',इतकी सोपी व्याख्या उद्योजकतेची केली आहे.थोडक्यात उद्योजकता (Entrepreneurship) म्हणजे केवळ व्यवसायाच्या संकल्पना मांडणे, त्यावर काम करणे आणि त्याचा विस्तार करणे इतकाच नव्हे, तर जगावेगळा विचार करून आपले उत्पादन जगातील सर्वश्रेष्ठ उत्पादन बनवणे हा होय.

वर्तमान काळात काहीही न करता बसणे व इतरांना आपल्या प्रगतीतील अडथळा मानने या ऐवजी 'मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार'हाच संस्कार तरुणांमध्ये दृढ होणे हा उद्योजकतेचा महत्वाचा पैलू आहे.उद्योजकता म्हणजेउद्योजकीय मानसिकता,धोका पत्करणे,धडपड करणे,सृजनशीलता वाढवणे इत्यादींचा अंगीकार केल्यानंतर उद्योजकतेमध्ये यश मिळतेच म्हणून अशी मानसिकता जागतिकीकरणाच्या युगात असणेअत्यंत गरजेचे आहे.तरुणांच्या मध्ये उद्योजकीय वृत्ती वाढली तर देशाचा औद्योगिक व आर्थिक विकास होणे हे सहज शक्य आहे.

डेव्हिडमॅक्लेलँड यांच्या मते कोणत्याही राष्ट्राच्या औद्योगिकरणाची गती पायाभूत सोयी,नैसर्गिक साधनसंपत्ती,तंत्रज्ञान,अथवा भांडवलावर अवलंबून नसून त्या राष्ट्रातील उद्योजकतेवर अवलंबून असते.[9]कारण उद्योजकता ही उद्योजकाने सातत्याने चालवलेली प्रक्रिया असते,या प्रक्रीयेअंतर्गत उद्योजक नवनवीन कल्पना व तंत्रज्ञान वापरून उत्पादनाच्या घटकांचे एकत्रीकरण करतो व त्यातून नाविन्यपूर्ण वस्तू अथवा सेवांची निर्मिती करतो. अस्तित्वात असलेले व्यवसाय न करता वेगळा व्यवसाय निर्माण करण्याची संधी शोधत राहून नफा मिळवण्याच्या हेतूने उद्योजकाने चालवलेली प्रक्रिया म्हणजे उद्योजकता असे म्हणता येईल.

उद्योजकतेचा संबंध नाविन्यपूर्ण उपक्रमाची स्थापना,योजनाबद्धरित्या त्या उपक्रमाचाविकास व त्यातून सामाजिक गरजांची पूर्तता त्याचबरोबर स्वतःचा आर्थिक विकास व संपत्तीची निर्मिती याच्याशी असतो.उद्योजकता म्हणजे उद्योजकाने आपला उद्योग स्थापन करून तो व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी करण्यासाठी केलेले प्रयत्न होय.यासाठी उद्योजक व्यावसायिक पर्यावरणाचे विश्लेषण करून नाविन्यपूर्ण वस्तू,प्रक्रिया,पद्धती विकसित करतो म्हणजेच पर्यावरणाला व्यवसायाच्या दृष्टीने सकारात्मक करतो.

भारतातील युवकांना उद्योजकतेकडे वळविणे हे आव्हानात्मक आहे परंतु अशक्य नाही.भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम म्हणतात 'महाविद्यालयीन वातावरणच विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय योग्यता निर्माण करण्यासाठी पोषक असते. आपण आपल्या विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी होण्यासाठी वाजवी धोका स्वीकारावाच लागतो याची जाणीव करून दिली

[7]साप्ताहिक स्वतंत्र नागरिक-दि.२३/११/२०१८

[8]संदर्भ-तरुण भारत-मुंबई दि.१०/०५/२०१९

[9]महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प.सोयाबीनपासून विविध प्रक्रिया उत्पादनांची निर्मिती-प्रशिक्षण पुस्तिका पान नं.८.

पाहिजे.आपल्याकडून चागलीच कृती होईल असा विश्वास त्याच्यामध्ये निर्माण केला पाहिजे.ही क्षमताच भविष्यात त्याच्याकडून आव्हानात्मक काम यशस्वीरीत्या पूर्ण करवून घेईल.'[10]

**समारोप**

जागतिकीकरणाच्या युगामध्ये भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करावयाची असेल तर देशाच्या ग्रामीण भागापर्यंत उद्योजकतेची संकल्पना पोहचली पाहिजे.यासाठी केंद्र सरकार,राज्यास सरकार व इतर अनेक संघटना प्रयत्नशील आहेत.आज भारताची अर्थव्यवस्था जगातील उभरती अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे.जगातील प्रत्येक बहुराष्ट्रीय कंपनीला भारतीय बाजारपेठेची भुरळ पडली आहे.या कंपन्या भारतात नवीन वस्तू व सेवा सादर करून भारतीय बाजारपेठ काबीज करीत आहेत परंतु हे भारतीय युवकांच्या दृष्टीने धोक्याचे आहे कारण या कंपनीतील नोकर म्हणूनच त्याची ओळख निर्माण होण्याचा धोका आहे.ज्याअर्थी या कंपन्या भारतात येऊन यशस्वीरीत्या उद्योग करू शकतात त्याअर्थी भारतीय उद्योजकांना सुद्धा ही संधी आहे असे म्हणणे चूक ठरणार नाही. भारताच्या वाढत्या लोकसंख्येच्या वैविध्यपूर्ण गरजा आहेत,त्यामध्ये वाढ होणार आहे,त्याचे स्वरूप बदलणार आहे,अशा परिस्थितीत भारतातील उद्योजकांना ही फार मोठी संधी आहे.

[10]THE HINDU, dated August 28, 2005, Madurai, Tamilnadu, p.1.